**समरी फौजदारी खटला क्र.३९८/२०१५ मधील निशाणी क्र.०९ खालील आदेश.**

**सरकार वि. सुधीर राजाराम पाटील**

प्रस्तुत अर्ज आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत कलम २३९ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. आरोपीचे असे कथन आहे की ते, ग्रामपंचायत सार्वत्रीक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमासंदर्भात दि.१४.०१.२०१५ रोजी प्रशिक्षणास व दि.१५.०१.२०१५ रोजी प्रभाग रचनेच्या कामास हजर होते. परंतु दि.१४ ते १९.०१.२०१५ पर्यंत ते गैरहजर राहुन निवडणुकीच्या कामामध्ये बाधा निर्माण केल्याचे आरोप त्यांच्यावर लावण्यात आले आहे. परंतु याबाबींची सखोल चौकशी करण्यात आलेली नाही. तहसिलदार कार्यालयातुन ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेच्या व आरक्षणाच्या कार्यक्रमाबाबत कोणत्याही स्वरुपाची दि.१४.०१.२०१५ रोजीची नोटीस त्यांना देण्यात आलेली नव्हती व कार्यक्रमाबाबत आरोपीस माहीती नव्हती. आरोपी हा दि.१४.०१.२०१५ रोजी खासदार चंद्रकांतजी खैरे यांनी बोलवलेल्या आढावा बैठकीसाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद शासकीय मिटींगसाठी हजर होते. तसे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचे दि.०५.०२.२०१५ चे प्रमाणपत्र दाखल आहे. तसेच दि.१५.०१.२०१५ रोजी व दि.१६.०१.२०१५ रोजी अनंत कुलकर्णी, अतिरिक्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या दालनात संबंधीत अधिका-यांच्या बरोबर शासकीय कामासाठी आरोपी हजर होते. त्यानंतर दि.१७.०१.२०१५ रोजी न्यायालयीन कामकाजासाठी सरकारी वकिल यांच्या कार्यालयात ते हजर होते. त्याबाबतचे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम), विभाग पदमपुरा औरंगाबाद यांचे प्रमाणपत्र त्यांनी अभिलेखावर दाखल केले. त्यानंतर दि.१८.०१.२०१५ रोजीची रविवारची सुट्टी घेवुन संबंधीत अधिका-याकडुन परवानगी घेवुन दि.१९.०१.२०१५ रोजी खाजगी कामासाठी त्यांनी किरकोळ रजा दिली व दि.१७.०१.२०१५ रोजीची कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम ) विभाग यांची प्रत त्यांनी दाखल

07/02/2024

केली आहे. त्यामुळे प्रस्तुत गुन्हयात ग्रामपंचायत रोहीला खुर्द या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेच्या व आरक्षणाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात अध्यासी अधिकारी म्हणुन आरोपीच्या नावाने त्रास देण्याचे व गुन्हा दाखल करण्याच्या हेतुने खोटे व बनावट नोटीसा तयार करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. खरे तर ग्रामपंचायत रोहीला खुर्द येथे तहसिलदार कार्यालयातुन प्रभाग रचनेचे काम एस.आर. पाटील, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) कन्नड यांच्या नावाने आदेश होता व त्याप्रमाणे काम पुर्ण केलेले आहे. तहसिलदार कार्यालयातुन शाखा अभियंता या नावाने आदेश निघालेले आहे. आरोपी हा उप अभियंता आहे व त्यांच्या नावाने कोणताही आदेश नाही. त्यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेला गुन्हा बिनबुडाचा आहे. त्यामुळे आरोपीची प्रस्तुत गुन्हयातुन मुक्तका (discharge) करण्यात यावे.

३. अभियोग पक्षाने प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, आरोपी विरुध्द प्रथमदर्शनी पुरावा आढळुन येत आहे. तसेच तपासी अंमलदाराने आरोपी विरुध्द सखोल चौकशी करुन दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभियोगपक्षाने त्यांचे म्हणण्यात दिलेले मुद्दे युक्तीवादात मांडलेले आहे.

५. आरोपीच्या विधीज्ञांनी सुध्दा त्यांच्या अर्जातील कथनांचे पुनरावृत्ती युक्तीवादात केलेली आहे व प्रामुख्याने आरोपीला कधीही दि.१४.०१.२०१५ चे निवडणुकीच्या कार्यक्रमाची नोटीस नव्हती व आरोपी हे उप अभियंता असुन त्यांच्या नावे कोणतेही आदेश निघाला नव्हता. आरोपी दि.१४ ते १७.०१.२०१५ पर्यंत शासकीय कामामध्ये व्यस्त होते. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन आरोपी विरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीला या गुन्हयातुन मुक्तता (discharge) देण्यात यावे.

६. अर्जाचे व म्हणण्याचे तसेच दोन्ही बाजुंच्या युक्तीवादाचे अनुषंगाने खालील प्रमाणे विचाराधीन प्रश्न उत्पन्न होत असुन त्या प्रश्नांवर चर्चा होवुन त्यांचे निष्कर्ष खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

VNK
07/02/2024

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ प्रमाणे बरोबर आहे का ? | नाही. |
| २ | आरोपी विरुध्द केलेले आरोप हे निराधार आहेत का ? | नाही. |
| ३ | आरोपीला विना दोषारोप सोडण्यात यावे का ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## कारणमिमांसा.

**विचाराधीन प्रश्न क्र.१**

७. प्रस्तुत अर्जाच्या विवेचनासाठी सर्व प्रथम आरोपीवर लादण्यात आलेले गुन्हयाबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. आरोपीने लोक प्रतिनिधी कायदा १९५१ कलम १३४ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम २३ अन्वये आरोप लावण्यात आले आहेत. लोक प्रतिनिधी कायदा १९५१ कलम १३४ मध्ये निवडणुकीच्या बाबतीत शासकीय कामामध्ये कसुर केल्यास ५००/- रुपयापर्यंत दंड अशी शिक्षा देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा १९४९ अंतर्गत सुध्दा ५००/- रुपयाचे दंड निवडणुकीच्या बाबतीत शासकीय कामामध्ये कसुर केल्यास ठोठावण्यात आले आहे. त्यामुळे दोन्ही कायदया अंतर्गत शिक्षा ही दोन वर्षाच्या खाली असल्यामुळे प्रस्तुत प्रकरण हे समन्स केस म्हणुन चालवण्यात येत आहे. एखादया गुन्हयाला दोन व दोन वर्षापेक्षा शिक्षा असल्यास वॉरंट केस म्हणुन त्या गुन्हयाची संपरिक्षा घेण्यात येते व त्यामध्ये फौजदारी प्रक्रियां संहिता १९७३ अंतर्गत प्रकरण १९ प्रमाणे कलम २३९ अन्वये आरोपीला विना दोषारोप सोडण्याचे तरतुद आहे. परंतु फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत प्रकरण २० मध्ये समन्स खटल्याची संपरिक्षा कलम २५१ ते २५९ पर्यंत आरोपीला विना दोषारोप सोडल्याची कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत समन्स खटल्यामध्ये आरोपीला विना दोषारोप सोडल्याची कायदेशीर तरतुद नाही.

VNK 07/02/2024

त्यामुळे प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत कलम २३९ प्रमाणे बरोबर नाही. त्यामुळे विचाराधीन प्रश्न क्र.१ चे उत्तर ~~होकारार्थी~~ नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.२</u>**

८. आरोपी विरुध्द असा आरोप आहे की, आरोपी हे राज्य निवडणुक आयोग यांच्या आदेशान्वये जुलै ते डिसेंबर २०१५ या कालावधीत संपणा-या ग्रामपंचायतीचा प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम घोषीत झाल्यानंतर त्यांची नेमणुक ग्रामपंचायत रोहीला खुर्द, ता. कन्नड येथे अध्यासी अधिकारी म्हणुन करण्यात आली होती. परंतु त्यांनी कार्यक्रमात भाग घेतला नाही व नेमुन दिलेले काम केले नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द तहसिलदार कार्यालयामार्फत तक्रार दाखल करण्यात आली व लोक प्रतिनीधी अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम २३ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. त्या संदर्भात अभिलेखावर नजर फिरवली असता असे लक्षात येते की, तहसिलदार कार्यालय कन्नड येथुन दि.३०.०१.२०१५ रोजी पोलीस ठाणे कन्नड यांना पत्र पाठविण्यात आले की, 'एस.आर.पाटील' या नावाचे दोन अधिकारी असल्याने व सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम कन्नड येथील एस.आर.पाटील ची नेमणुक रोहीला खुर्द साठी झालेली होती व त्यांनी त्यांचे नेमुन दिलेले काम पुर्ण केलेले आहे. तसेच फिर्यादी उमाकांत विष्णुपंत लेकुरवाळे यांचे दि.१५.०४.२०१५ चे पोलीसांच्या स्मरणपत्राच्या अनुषंगाने दाखल केलेले पत्र पाहीले असता त्यात सुध्दा त्यांनी असे नमुद केले आहे की, एस.आर.पाटील यांना ग्रामपंचायत रोहीला खुर्द ता. कन्नड येथे ग्रामपंचायत प्रभाग रचना व आरक्षण करण्यासाठी नेमण्यात आले होते परंतु एस. आर. पाटील या नावाचे दोन व्यक्ती असल्याने रोहीला खुर्द येथील नेमुन दिलेले काम एस.आर. पाटील शाखा अभियंता यांनी पुर्ण केलेले आहे व आरोपी हे उप विभागीय अभियंता उप विभाग, कन्नड (पुर्व) यांनी त्यांना वाकी येथे ग्रामपंचायतीचे दिलेले काम पुर्ण केलेले नाही.

९. आरोपीने स्वतः त्यांच्या अर्जामध्ये असे नमुद केलेले आहे की, ते उप अभियंता आहेत. त्यामुळे आरोपी यांनी त्यांना वाकीला दिलेले काम पुर्ण केलेले नाही असे फिर्यादीचे दि.१५.०४.२०१५ च्या पत्रातुन दिसुन येत आहे. तसेच फिर्यादीने त्यात नमुद केले आहे की, गावाच्या नावामध्ये व आरोपीच्या नेमणुकीमध्ये गफलत झाली आहे व त्यामुळे त्यांनी तशी माहीती पोलीसांना दिली आहे. तसेच अभिलेखावर दाखल असलेले दि.०७.०१.२०१५ चे तहसिलदार कार्यालयाचे आदेशानुसार आरोपी हे उप अभियंता सार्वजनिक बांधकाम पुर्व कन्नड येथील नेमणुकीस असताना त्यांना वाकी येथे अध्यासी

07/02/2024

अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.

१०. त्यानंतर दि.१५.०१.२०१५ च्या कारणा दाखवा नोटीसीमध्ये आरोपीला उद्देशुन असे स्पष्ट नमुद केले आहे की, त्यांना अध्यासी अधिकारी म्हणुन नेमले होते परंतु ते दि.१४.०१.२०१५ रोजी प्रशिक्षणास गैरहजर राहुन प्रत्यक्ष प्रभाग रचना व आरक्षणास नेमुन दिलेले कार्यक्रमास सुरुवात केली नाही व त्यांना वेळोवेळी दुरध्वनीव्दारे सुचित केले असले तरी त्यांनी कोणतेही कार्यवाही केली नाही. त्यामुळे त्यांनी निवडणुकीच्या कामात कसुर केली आहे. सदर कारणे दाखवा नोटीसर्सावजनिक बांधकाम उप विभाग पुर्व, कन्नड यांना दि.१५.०१.२०१५ रोजी प्राप्त झाली आहे. त्यामुळे आरोपीच्या नावाने दि.०७.०१.२०१५ चे तहसिलदार कार्यालयाचे आदेश व दि.१५.०१.२०१५ चे कारणे दाखवा नोटीसीमधुन असे स्पष्ट लक्षात येते की, आरोपी हे वाकी येथे अध्यासी अधिकारी म्हणुन नेमणुक झाल्यानंतर प्रशिक्षणास व निवडणुकीच्या कामास टाळाटाळ करत होते व ते गैरहजर राहीले. त्यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेले आरोप हे निराधार नसुन महत्वाच्या दोन कागदपत्रांमध्ये म्हणजेच आरोपीच्या नावाने दि.०७.०१.२०१५ चे तहसिलदार कार्यालयाचे आदेश व दि.१५.०१.२०१५ चे कारणे दाखवा नोटीसी मधुन आरोपी विरुध्द लोकप्रतिनिधी अधिनियम १९७१ अंतर्गत कलम १३४ व महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा १९५८ अंतर्गत कलम २३ चे प्रथमदर्शनी गुन्हा आढळुन येत आहे. आरोपीने जरी काही कागदपत्रे अर्जासोबत दाखल केले असले तरी जसे की दि.१४.०१.२०१५ व १५.०१.२०१५ व १६.०१.२०१५ चे शासकीय कामे तरी हे कागदपत्रांच्या शाबीतीसाठी आरोपीला पुरावा देणे अपेक्षीत आहे. तसेच त्यांनी एस. आर. पाटील शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम पश्चिम कन्नड यांचे रोहीला खुर्दचे नेमणुकीचे आदेश दाखल केले आहे व तसेच त्यांचा दि.३०.०१.२०१५ चा अर्जही दाखल केला आहे. परंतु एस. आर. पाटील शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम पश्चिम कन्नड यांनी त्यांचे रोहीला खुर्द येथील निवडणुकीचे नेमुन दिलेले काम पुर्ण केले आहे असे फिर्यादीने दि.१५.०४.२०१५ च्या पत्रामध्ये नमुद केले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात आरोपीच्या विरुध्द प्रथमदर्शनी गुन्हा दिसुन येत असुन आरोपी विरुध्द खटला चालवण्यात नियमाप्रमाणे योग्य आहे. त्यामुळे विचाराधीन प्रश्न क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.३</u>**

११. विचाराधीन प्रश्न क्र.१ ते २ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात आले आहे.

07/02/2024

प्रस्तुत प्रकरण हे समन्स खटला असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत कलम २३९ चे तरतुदीचा आरोपीला काही उपयोग होणार नाही. आरोपी विरुध्द लादण्यात आलेले आरोप हे निराधान नसुन अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार आरोपी हे निवडणुकीच्या कामकाजात अध्यासी अधिकारी नेमल्यानंतरही हजर नव्हते. त्यामुळे आरोपीला विना दोषारोप सोडता येणार नाही. त्यामुळे विचाराधीन प्रश्न क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येत आहे. प्रस्तुत गुन्हयाचा खटला पुढे चालवुन आरोपीला त्यांच्या बचावामध्ये पुरावा देण्याची संधी उपलब्ध आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

08/02/2024

**दिनांक –०८/०२/२०२४.**

**(काटकर विजया एन.एस)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३) कन्नड.